RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक १५२(२)] गुरुवार, डिसेंबर ९, २०२१/अग्रहायण १८, शके १९४३ [पृष्ठे ८, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३७५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ०७ डिसेंबर २०२१.

**अधिसूचना**

**नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार व सेवाशर्ती) अधिनियम, १९७१.**

क्रमांक तंशिले-२४१९/प्र.क्र.५७/१९/तांशि-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी, व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा.२८) याच्या कलम ७ च्या पोट-कलम (२) अन्वये घटित केलेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त प्राधिकरण" असा केला आहे.) लेख्यांची, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडून लेखापरीक्षा करणे लोकहितार्थ आवश्यक असल्याची महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली आहे ;

त्याअर्थी, आता, नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार व सेवा शर्ती) अधिनियम, १९७१ (१९७१ चा ५६) याच्या कलम २० च्या पोट-कलम (१) तसेच महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा.२८) याच्या कलम १८ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय केल्यानंतर आणि अशा लेखापरीक्षेच्या प्रस्तावाच्या संबंधात, उक्त प्राधिकरणाला प्रतिवेदन करण्याची संधी दिल्यानंतर दिनांक २२ ऑगस्ट, २०१९ रोजी सुरू होणाऱ्या आणि दिनांक ३१ मार्च, २०२४ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी उक्त प्राधिकरणाच्या लेख्यांची यासोबत जोडलेल्या अनुसूचीत नमूद केलेल्या अटी व शर्तींवर लेखापरीक्षा करण्याची विनंती याद्वारे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना करीत आहेत.

## अनुसूची

[नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार व सेवाशर्ती) अधिनियम, १९७१ (१९७१ चा ५६) याच्या कलम २० च्या पोट-कलम (१) अन्वये भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडे लेखापरीक्षा सोपविण्याच्या अटी व शर्ती]

## अटी व शर्ती

(१) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक हे त्यांच्या वतीने व त्यांनी दिलेले निदेश किंवा मार्गदर्शक तत्त्वे यांआधारे, लेखापरीक्षा करण्यासाठी प्राथमिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करण्यास सुचवू शकतात. अशा बाबतीत अशा लेखापरीक्षकाची फी, उक्त प्राधिकरणाकडून प्रदेय असेल आणि जिथे असा लेखापरीक्षक नियुक्त केलेला नसेल तेथे, लेखापरीक्षेच्या संबंधात भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी केलेला खर्च, उक्त प्राधिकरणाकडून त्यांना प्रदेय असेल.

(२) जेथे, अशारीतीने प्राथमिक लेखापरिक्षक नियुक्त केला आहे तेथे, त्याने करावयाच्या लेखापरीक्षेबरोबरच, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकास, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, लेख्यांची अशी चाचणीदाखल तपासणी करण्याचा आणि प्राथमिक लेखापरीक्षकाच्या पुरवणी अहवालावर भाष्य करण्याचा हक्क असेल.

(३) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना किंवा अशा लेखापरीक्षेच्या संबंधात त्याने नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, शासकीय लेख्यांची लेखापरीक्षा करण्याच्या संबंधात, नियंत्रक व महालेखापरीक्षकास जे हक्क, विशेषाधिकार व प्राधिकार असतात तेच हक्क, विशेषाधिकार व प्राधिकार असतील.

(४) नियंत्रक व महालेखापरीक्षक किंवा त्याने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, लेखापरीक्षेचा अहवाल, नियामक मंडळाला कळवील, जे, त्याच्या अभिप्रायासह त्या अहवालाची एक प्रत, शासनाला सादर करील. नियंत्रक व महालेखापरीक्षक देखील अहवालाची एक प्रत थेट शासनाला सादर करील.

(५) लोकहितास्तव, नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडे सोपवलेली लेखापरीक्षा ही, त्या कालावधीनंतर व्यवस्थेचे पुनर्विलोकन करण्यास अधीन राहून, पहिल्या प्रसंगी, प्रारंभापासून पाच वर्षांच्या लेखा कालावधीसाठी असेल.

(६) लेखापरीक्षेची व्याप्ती, विस्तार व ती करण्याची रीत, नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी ठरविल्याप्रमाणे असेल.

(७) नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना, त्याच्या स्वेच्छानिर्णयात, लेखापरीक्षा अहवाल, राज्य विधानमंडळाला कळविण्याचा हक्क असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सतिश तिडके,**
शासनाचे उप सचिव.

HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Madam CamaMarg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 7th December 2021.

*NOTIFICATION*

Comptroller and Auditor General's (Duties, Powers and Conditions) Act, 1971.

No. TEAU-2419/C.R.57/2019/TE-3.—Whereas, the Governor of Maharashtra is satisfied that it is necessary in the public interest, to audit the accounts of the Admission Regulating Authority constituted under sub-section *(2)* of section 7 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah. XXVIII of 2015) (hereinafter referred to as "the said Authority"), by the Comptroller and Auditor General of India ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(1)* of section 20 of the Comptroller and Auditor General's (Duties, Powers and Conditions of Service) Act, 1971 (56 of 1971) read with section 18 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah. XXVIII of 2015), the Governor of Maharashtra, after consultation with the Comptroller and Auditor-General of India and after giving the said Authority an opportunity to make representation with regard to the proposal for such audit, hereby request the Comptroller and Auditor-General of India to audit the accounts of the said Authority for the period commencing on the 22nd August 2019 and ending on the 31st March 2024, on the terms and conditions mentioned in the Schedule appended hereto.

*Schedule*

[Terms and conditions for entrustment of audit to the Comptroller and Auditor-General of India under sub-section *(1)* of section 20 of the Comptroller and Auditor General's (Duties, Powers and Conditions of Service) Act, 1971 (56 of 1971).]

**Terms and conditions**

(1) The Comptroller and Auditor-General of India may, suggest the appointment of a Primary Auditor to conduct the audit on his behalf and on the basis of directions or guidelines issued by him. In Such a case the fees to such auditor will be payable by the said Authority and where such an auditor is not appointed, expenditure incurred by Comptroller and Auditor-General of India, in connection with the audit will be payable to him by the said Authority.

(2) In addition to audit to be conducted by the primary auditor, where so appointed, the Comptroller and Auditor-General of India will have the right to conduct such test check of the accounts and to comment on the supplement report of the primary auditor, as he may deem fit.

(3) The Comptroller and Auditor-General of India or any person appointed by him in connection with such audit, shall have the same right, privileges and authority as the Comptroller and Auditor-General has in connection with the audit of the Government accounts.

(4) The report of audit will be communicated by Comptroller and Auditor-General or any persons appointed by him to the Governing body who shall submit a copy of the report along with its observation to the Government. The Comptroller and Auditor-General shall also forward a copy of the report directly to the Government.

(5) The audit entrusted to the Comptroller and Auditor-General in public interest shall be for a period of five years accounts from inception in the first instance, subject to review of arrangement after that period.

(6) The scope, extent and manner of conducting audit shall be as decided by the Comptroller and Auditor-General.

(7) The Comptroller and Auditor-General will have the right to report to the State Legislature, the audit report at his discretion.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH TIDKE,
Deputy Secretary to Government.

## उच्च व तंत्रशिक्षण विभाग

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ७ डिसेंबर २०२१

### अधिसूचना

**नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार व सेवाशर्ती) अधिनियम, १९७१.**

क्रमांक तंशिले-२४१९/प्र.क्र.५७/१९/तांशि-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा.२८) याच्या कलम ११ च्या पोट-कलम (२) अन्वये घटित केलेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त प्राधिकरण" असा केला आहे) लेख्यांची, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडून लेखापरीक्षा करणे लोकहितार्थ आवश्यक असल्याची महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली आहे ;

त्याअर्थी, आता, नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार व सेवा शर्ती) अधिनियम, १९७१ (१९७१ चा ५६) याच्या कलम २० च्या पोट-कलम (१) तसेच महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा.२८) याच्या कलम १८ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय केल्यानंतर आणि अशा लेखापरीक्षेच्या प्रस्तावाच्या संबंधात, उक्त प्राधिकरणाला प्रतिवेदन करण्याची संधी दिल्यानंतर दिनांक १८ मार्च २०१६ रोजी सुरु होणाऱ्या आणि दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी उक्त प्राधिकरणाच्या लेख्यांची यासोबत जोडलेल्या अनुसूचित नमूद केलेल्या अटी व शर्तींवर लेखापरीक्षा करण्याची विनंती याद्वारे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना करीत आहेत.

### अनुसूची

[नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार व सेवाशर्ती) अधिनियम, १९७१ (१९७१ चा ५६) याच्या कलम २० च्या पोट-कलम(१) अन्वये भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडे लेखापरीक्षा सोपविण्याच्या अटी व शर्ती).]

### अटी व शर्ती

(१) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक हे त्यांच्या वतीने व त्यांनी दिलेले निदेश किंवा मार्गदर्शक तत्वे यांआधारे, लेखापरीक्षा करण्यासाठी प्राथमिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करण्यास सुचवू शकतात. अशा बाबतीत अशा लेखापरीक्षकाची फी, उक्त प्राधिकरणाकडून प्रदेय असेल आणि जिथे असा लेखापरीक्षक नियुक्त केलेला नसेल तेथे, लेखापरीक्षेच्या संबंधात भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी केलेला खर्च, उक्त प्राधिकरणाकडून त्यांना प्रदेय असेल.

(२) जेथे, अशा रीतीने प्राथमिक लेखापरिक्षक नियुक्त केला आहे तेथे, त्याने करावयाच्या लेखापरिक्षेबरोबरच, भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षकास, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, लेख्यांची अशी चाचणीदाखल तपासणी करण्याचा आणि प्राथमिक लेखापरिक्षकाच्या पुरवणी अहवालावर भाष्य करण्याचा हक्क असेल.

(३) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना किंवा अशा लेखापरिक्षेच्या संबंधात त्याने नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, शासकीय लेख्यांची लेखापरिक्षा करण्याच्या संबंधात, नियंत्रक व महालेखापरिक्षकास जे हक्क, विशेषाधिकार व प्राधिकार असतात तेच हक्क, विशेषाधिकार व प्राधिकार असतील.

(४) नियंत्रक व महालेखापरीक्षक किंवा त्याने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, लेखापरीक्षेचा अहवाल, नियामक मंडळाला कळवील, जे, त्याच्या अभिप्रायासह त्या अहवालाची एक प्रत, शासनाला सादर करील. नियंत्रक व महालेखापरीक्षक देखील अहवालाची एक प्रत थेट शासनाला सादर करील.

(५) लोकहितास्तव, नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्याकडे सोपवलेली लेखापरिक्षा ही, त्या कालावधीनंतर व्यवस्थेचे पुनर्विलोकन करण्यास अधीन राहून, पहिल्या प्रसंगी, प्रारंभापासून पाच वर्षांच्या लेखा कालावधीसाठी असेल.

(६) लेखापरीक्षेची व्याप्ती, विस्तार व ती करण्याची रीत, नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी ठरविल्याप्रमाणे असेल.

(७) नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना, त्याच्या स्वेच्छानिर्णयात, लेखापरीक्षा अहवाल, राज्य विधानमंडळाला कळविण्याचा हक्क असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सतिश तिडके,**
शासनाचे उप सचिव.

HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 7th December 2021.

*NOTIFICATION*

Comptroller and Auditor General's (Duties, Powers and Conditions) Act, 1971.

No. TEAU-2419/C.R.57/2019/TE-3.—Whereas, the Governor of Maharashtra is satisfied that it is necessary in the public interest, to audit the accounts of the Fees Regulating Authority constituted under sub-section *(2)* of section 11 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah. XXVIII OF 2015) (hereinafter referred to as "the said Authority"), by the Comptroller and Auditor General of India :

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(1)* of section 20 of the Comptroller and Auditor General's (Duties, Powers and Conditions of Service) Act, 1971 (56 of 1971) read with section 18 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah. XXVIII of 2015), the Governor of Maharashtra, after consultation with the Comptroller and Auditor-General of India and after giving the said Authority an opportunity to make representation with regard to the proposal for such audit, hereby request the Comptroller and Auditor-General of India to audit the accounts of the said Authority for the period commencing on the 18th March 2016 and ending on the 31st March 2021, on the terms and conditions mentioned in the Schedule appended hereto.

*Schedule*

[Terms and conditions for entrustment of audit to the Comptroller and Auditor-General of India under sub-section *(1)* of section 20 of the Comptroller and Auditor General's (Duties, Powers and Conditions of Service) Act, 1971 (56 of 1971).]

**Terms and conditions**

(1) The Comptroller and Auditor-General of India may, suggest the appointment of a Primary Auditor to conduct the audit on his behalf and on the basis of directions or guidelines issued by him. In Such a case the fees to such auditor will be payable by the said Authority and where such an auditor is not appointed, expenditure incurred by Comptroller and Auditor-General of India, in connection with the audit will be payable to him by the said Authority.

(2) In addition to audit to be conducted by the primary auditor, where so appointed, the Comptroller and Auditor-General of India will have the right to conduct such test check of the accounts and to comment on the supplement report of the primary auditor, as he may deem fit.

(3) The Comptroller and Auditor-General of India or any person appointed by him in connection with such audit,shall have the same right, privileges and authority as the Comptroller and Auditor-General has in connection with the audit of the Government accounts.

(4) The report of audit will be communicated by Comptroller and Auditor-General or any persons appointed by him to the Governing body who shall submit a copy of the report along with its observation to the Government. The Comptroller and Auditor-General shall also forward a copy of the report directly to the Government.

(5) The audit entrusted to the Comptroller and Auditor-General in public interest shall be for a period of five years accounts from inception in the first instance, subject to review of arrangement after that period.

(6) The scope, extent and manner of conducting audit shall be as decided by the Comptroller and Auditor-General.

(7) The Comptroller and Auditor-General will have the right to report to the State Legislature, the audit report at his discretion.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH TIDKE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.